सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# माननीय श्री. चे. विद्यासागर राव

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

२५ फेब्रुवारी २०१९

**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

१. राज्य विधानमंडळाच्या २०१९ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनामध्ये आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे.

२. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आणि यांसारख्या इतर अनेक थोर नेत्यांनी आणि समाजसुधारकांनी घालून दिलेल्या उच्च आदर्शांमुळे राज्याच्या जनतेची सेवा करण्यास माझ्या शासनाला सतत प्रेरणा मिळते.

३. माझे शासन, सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करीत असून, पुलवामासह देशभरात इतरत्र शहीद झालेले सैनिक व निमलष्करी दलातील जवानांना श्रध्दांजली अर्पण करीत आहे. माझे शासन, दहशतवाद आणि देशविघातक कारवायांचा मुकाबला करण्यासाठी भारत सरकारला सर्वतोपरी सहाय्य करण्यास कटिबद्ध आहे.

४. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेबाबत माझ्या शासनाने दावा केलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक जनतेचे सांविधानिक हक्क आणि विशेषाधिकाराबाबत माझे शासन संवेदनशील आहे. माझे शासन, सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणात सातत्याने एक ठाम भूमिका मांडत आहे.

५. माझ्या शासनाने, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचे कार्यादेश सप्टेंबर, २०१८ मध्ये काढले आहेत. प्रत्यक्ष काम विनाअडथळा होण्यासाठी आणि तो प्रकल्प कालबद्ध रीतीने पूर्ण करण्यासाठी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यात येत आहे.